मानसिक रोग (फीट व वेडेपणा) यांचे पथ्य

चिकित्सा सूत्र :

"शुद्धस्याचारविभ्रंशे तिक्ष्णं नावनमज्जनम् ।
ताडनं च मनोबुध्दिदेहसंवेजनं हितम् ॥" च. चि.

नाष्टा : (खालील पैकी नाष्टयाला एक पदार्थ खावा.)

- **दुग्धाहार** - गाईचे दूध, सुंठ/वेलची सिद्ध,आल्याचा चहा अर्धा अर्धा कप चालेल.
- **फलाहार**- डाळींब, आंबा, द्राक्षे, कोहळा, अंजीर, पेठा, नारळ, कवठ.
- **युष सुप** - मूगाचे सुंठ, धणे, जिरे व तुपाची फोडणी दिलेले सूप किंवा खालील वर्णित फळभाज्या, पालेभाज्यांचे सूप किंवा भाताची पेज
- **लघ्वाहार**- रव्याचा उपमा शिरा/भाजलेले पोहे/मुगाचे लाडू

जेवण :

- **फळभाज्या**- सर्व चालतील (बटाटा, टोमॅटो, भरताचे वांगे, रताळी सोडून)
- **पालेभाज्या**-शेवगा, पालक, चवळाई (तादुळजा), चाकवत.
- **धान्य**- गव्हाचे फुलके/ज्वारी यांची भाकरी, जुनी ताबडी साळ.
- **भात**- जुन्या तांदळाचा भाजून केलेला भात/मुगाची खिचडी.
- **कढण/सूप** - वर वर्णन केलेले घ्यावे.
- **मांसाहार** - कोंबडी, बोकड,कासव यांचे सूप बोकडीच्या पायांचे सूप.
- **दुधांचे पदार्थ** - लोणी, तूप.
- **संस्कारित जल-** उष्णोदक (गरम केलेले पाणी) जटामांसी, गुग्गुळ, कंकोळ सिद्धजल
- **इतर** - सुंठ, आले, गाजर, ओली हळद, शिंगाडा, लसूण.

विहार :

- त्रासन चिकित्सा
- धूपण, अंजन
- ब्रह्मचर्य पाळावे (शारीरिक संबंध ठेऊ नये).

विशिष्ट पथ्य :

- **कोहळ्याचे बी + मध याने चांगला लाभ किंवा वेखंड चूर्ण + मध**
- **वैद्यांचा सल्ला घेऊन गव्हाचे सत्व कोहळ्यासह/ द्राक्षारसासह प्यावे.**
- **बसमध्ये, येता जाता रस्त्यावर खाणे टाळावे.**
- **बटाटा, साबुदाणा, अरबी, बीट खाऊ नये. कांदा, लसूण खाऊ नये.**
- **शिळे, शुष्क अन्न व सॉस खाऊ नये.**
- **व्यसने (सुपारी, पान, तंबाखू, गुटखा) करू नये.**
- **दही, बर्फी, रबडी, श्रीखंड, पेढे खाऊ नये.**
- **रात्री जागरण व दिवसा झोप पूर्णतः वर्ज्य करावे.**

पंचकम : बस्ति नस्य, अग्नीकर्म , शिरोधारा, पिचू धूम्रपान, सिरावेध

अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका ➡ index

क्र.	माधवप्रिया शाखा	संपर्क	पत्ता
१	घाटकोपर - प्रमुख शाखा	7045607187	
२	कांदिवली	7304751357	
३	गिरगाव	022-22081081	
४	पुणे - तिसरा रविवार	8169507436	
५	कोल्हापूर - पहिला रविवार	7045607187	